महाराष्ट्र शासन

क्रमांक : एसएसएन-३८७०/५८२०२-ई
शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग
दिनांक : १६. एप्रल १९७१

श्री. रा. रा.
अध्यक्ष/सचिव,

रंगदास स्वामी शिक्षण वि. मंडळ, ओझे
ता. जुन्नर जि. पुणे.

महोदय,

आपल्या संस्थेने केलेल्या अपीलानुसार रवोडद ता. जुन्नर जि. पुणे येथे नवीन माध्यमिक शाळा शैक्षणिक वर्ष १९७१-७२ मध्ये उघडण्यासंबंधीचा प्रस्ताव विचारात घेऊन सदर माध्यमिक शाळेत जून १९७१मध्ये इयत्ता आठवी मराठी माध्यमातून उघडण्याची अनुदानसहित तत्वावर परवानगी देण्याचा मानस आहे. याबाबत अंतिम निर्णय खालील अटींची पूर्तता उशिरात उशिरा १५/५/७१ पर्यन्त आपल्याकडून झाली आहे किंवा नाही याची खात्री करून घेतल्यावरच घेण्यात येईल.

अटी :

१) संस्थेच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने सदर शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या किमान एक वर्षाच्या पगाराइतकी रक्कम (प्रत्येक वर्गामागे रु. ५०००) संस्थेजवळ असली पाहिजे व ही रक्कम कोणत्याही अधिकृत बँकेत ठेवलेली असावी.

२) सदर शाळेत उघडावयाच्या वर्गाकरिता पुरेशा व योग्य इमारतीची सोय झालेली असावी.

३) नवीन वर्गाकरिता आवश्यक असलेल्या साहित्याची व फर्निचरची खरेदी करण्याची व्यवस्था झालेली असावी.

४) सदर शाळेकरिता पुरेसा प्रशिक्षित पदवीधर शिक्षक संच नेमण्याची व्यवस्था झालेली असावी.

५) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदविलेली असावी.

६) इ. ८ वी खेरीज इतर वर्ग उघडण्याची परवानगी आपल्याला देण्यात आलेली नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,
उ. तु. भेलांडे
(उ. तु. भेलांडे)
अवर सचिव,
शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग.

माहिती मिळाली
S. Shirke

मुख्याध्यापक
महात्मा फुले विद्यालय, ओझर
ता. जुन्नर, जि. पुणे